सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील मागासप्रवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती/ फ्रि-शिपची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत उपाययोजना

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ मे, २०१८

वाचा :

(१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.४०३/ शिक्षण-१, दिनांक ०७ ऑगस्ट,२०१७

(२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/ शिक्षण-१, दिनांक ८ डिसेंबर,२०१७

(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/ शिक्षण-१, दिनांक २९.०१.२०१८

प्रस्तावना :-

राज्य शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण ( DBT ) प्रक्रिया राबविण्याबाबत सर्व संबंधित विभागांनी अधिसूचना निर्गमित केलेल्या आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २५ मे,२०१७ च्या अधिसूचनेनुसार, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, परीक्षा फी प्रदाने, निर्वाह भत्ता, विद्यावेतने विषयक योजनांतर्गत लाभ मिळण्याकरीता अर्ज करण्यापासून ते रक्कम लाभार्थ्यांच्या बॅन्क खात्यात जमा करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया, माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या राज्य स्तरीय महा-डिबीटी पोर्टलवर करणे संदर्भीय दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनिवार्य करण्यात आलेले आहे.

२. दरम्यान, सदर महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्जाची नोंद केल्यानंतर त्यांना अदा करावयाचे लाभ प्रदान करण्याबाबतची ऑनलाईन प्रक्रिया महाडिबीटी एजन्सी मार्फत प्रगतीत असल्याने, पात्र विद्यार्थ्यास महाविद्यालयात फी भरण्यास अडचणी निर्माण होवू नयेत म्हणून, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात पहिल्या सहामाहीसाठी शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या ५० % च्या ६०% इतकी रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर बंधपत्र घेवून जमा करण्याचा निर्णय

९) अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव मंत्रालयीन सर्व विभाग.
१५) आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
२०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२१) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२३) सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग.
२४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२६) कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२७) कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२८) निवड नस्ती ( कार्यासन-शिक्षण).

(ii) संबंधित महाविद्यालयाने खात्री व पडताळणी करुन सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज हे, संबंधित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र, आवश्यक तेथे वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार, मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र / पुरावा, उत्पन्न दाखला, व महाविद्यालयाचे हमीपत्र (परिशिष्ट-अ, हार्ड कॉपी) इ.कागदपत्रे तपासून **दोन आठवड्यात मंजूर करण्याची** दक्षता संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी घ्यावी.

(iii) शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व निर्वाह भत्त्याचे देयक कोषागार कार्यालयास मॅन्युअली सादर करण्यात यावेत. कोषागार कार्यालयामार्फत सहायक आयुक्त, समाज कल्याण/आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यावर देयकांची रक्कम जमा झाल्यानंतर संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण/आहरण व संवितरण अधिकारी यांच्या खात्यातून देयकाच्या रक्कमेतील शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था/विद्यापीठाच्या बॅन्क खात्यावर आणि निर्वाह भत्त्याची रक्कम ईसीएसद्वारे संबंधित बँकेकडे विद्यार्थ्याच्या नावासह आधार संलग्न बँक खात्यात जमा करणेसाठी **दोन आठवड्यात पाठविणे बंधनकारक राहील.** त्यानंतर संबंधित बँका, संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था/विद्यापीठाच्या बॅन्क खात्यावर शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम व संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर निर्वाहभत्त्याची रक्कम तात्काळ जमा करतील, अशा सूचना सर्व सहायक आयुक्तांनी द्याव्यात.

(iv) जी देयके कोषागार कार्यालयात सादर करण्यात आलेली आहेत परंतु त्याची अदायगी अद्याप होवू शकलेली नाही, अशा देयकांबाबत संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी या शासन निर्णयातील अटी शर्तींची पूर्तता झाल्याची खातरजमा करुनच वरील अ.क्र. (iii) प्रमाणे कार्यवाही करावी.

(iv) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांना या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी अदा केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क-परीक्षा शुल्क व निर्वाहभत्त्याचा तपशिल आणि प्रस्तुत शासन निर्णयानुसार अदा करण्यात येणाऱ्या लाभाच्या तपशिलाचे सर्व अभिलेखे जतन करण्याची जबाबदारी ही संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांची राहील.

(v) सन २०१७-१८ मधील ज्या विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क-परिक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयांना अदा केली जाईल, ती या शैक्षणिक वर्षात यापुर्वी संबंधित विद्यार्थी वा महाविद्यालयाला दिलेली नाही, तसेच अशा विद्यार्थ्यांना वा महाविद्यालयांना त्याच कालावधीसाठी ती पुन्हा दिली जाणार नाही, तसेच शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनेअंतर्गत दुबार लाभ प्रदान होणार नाही, याबाबत संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी दक्षता घ्यावी.

६. या शासन निर्णयातील तरतुदी ह्या केवळ सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी लागू राहतील.

७. सदरहू शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०५१७१७०९०६५०२२ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chandrakant haridas Wade

Digitally signed by Chandrakant haridas Wade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justic and S. A., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Chandrakant haridas Wade
Date: 2018.05.17 17:09:09 +05'30'

(चंद्रकांत ह.वडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (सा.न्या.व वि.स.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अमुस, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१६) आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१७) संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे
२०) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर.

शासन निर्णय :-

(१) केवळ सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये, ज्या महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना संबंधित विभागांकडील मागासप्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग) आणि आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अद्याप प्राप्त होवू शकलेली नाही, अशा महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना, त्यांच्याकडील प्रवेशित पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी आज अखेर लाभ अदा केलेले विद्यार्थी वगळुन, उर्वरीत विद्यार्थ्यांची अनुज्ञेय/पात्र अभ्यासक्रमांसाठी देय होणारी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेला खालील अटी/शर्तींवर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

(i) शासनाने विहीत केल्याप्रमाणे संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेने त्यांच्याकडील प्रवेशित विद्यार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज तपासून, प्राचार्यांच्या हमीपत्रासह (परिशिष्ट "अ" प्रमाणे) शासनाच्या संबंधित प्राधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील. (असे अर्ज प्राचार्यांच्या हमीपत्रासह यापुर्वी सादर केलेले असतील तर ते पुन्हा सादर करण्याची आवश्यकता नाही.)

(ii) प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे आधार व्हेरीफिकेशन झालेले असल्याचे संबंधित महाविद्यालयाने प्रमाणित करावे.

(iii) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये संबंधित मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक संस्थेने/ महाविद्यालयाने शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क घेतलेले नसल्याचे हमीपत्र शैक्षणिक संस्थेने/ महाविद्यालयाने शासनाच्या संबंधित प्राधिकारी यांच्याकडे अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

(iv) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेने सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची शासनाच्या संबंधित प्राधिकाऱ्याने तपासणी करुन, ज्या विद्यार्थ्यांना लाभ अदा केलेले आहेत, असे विद्यार्थी वगळुन उर्वरीत पात्र विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेस चार आठवड्यात अदा करावी.

(२) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पात्र विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता) च्या रक्कमेतील **निर्वाह भत्याची रक्कम** संबंधित पात्र विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यात यावी.

मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार शिष्यवृत्ती ही योजना कोणत्या अभ्यासक्रमासाठी लागू करावी, याबाबतचे स्पष्ट धोरण शासनाने शासनाने जाहीर करणे आवश्यक असल्याने, इतर मागासवर्ग मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या योजनेमध्ये केंद्र शासनाने सन १९९८ च्या पत्रकान्वये विहीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या गटानुसार एकुण ६७५ अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u> :-**

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील याचिका क्र. २४८७/२०१६ च्या अनुरोधाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत, केंद्र शासनाने सन १९९८ च्या पत्रकान्वये विहीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या गटानुसार सोबतच्या परिशिष्ठ- "अ" मध्ये नमूद केलेले एकुण ६७५ अभ्यासक्रम विहीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अभ्यासक्रमात यथास्थिती वाढ किंवा बदल करण्याचे अधिकार शासन वा शासन नियुक्त समितीस राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०८२३१६१३१२४६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao
Raghunath Gavit

(भा.र.गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
४) मा.राज्यमंत्री, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
५) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
६) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
७) मा.मंत्री, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
२५) निवडनस्ती (का.शिक्षण-१)

केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार शिष्यवृत्ती योजने अंतर्गत वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम विहीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०१७/प्र.क्र.१३/शिक्षण
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २१ ऑगस्ट, २०१७.

वाचा:-

१. शासन निर्णय सा.न्या.सां.का.,क्रि.व वि.स.विभाग क्रमांक : इबीसी १०६८/८३५६७/जे, दिनांक २४.१२.१९७०
२. केंद्रशासनाच्या सन १९९८ च्या मार्गदर्शक सूचना
३. शासन निर्णय सा.न्या.सां.का.,क्रि.व वि.स.विभाग क्रमांक : इबीसी १०९१/४६८६३/ प्र.क्र.५७२/मावक-२, दिनांक १०.५.१९९५
४. शासन निर्णय सा.न्या.सां.का.,क्रि.व वि.स.विभाग क्रमांक : इबीसी २००३/ प्र.क्र.३०१/ मावक-२, दिनांक १.११.२००३
५. शासन परिपत्रक सा.न्या.सां.का.,क्रि.व वि.स.विभाग क्रमांक : विजाक २००४/प्र.क्र.१६१/ मावक-३, दिनांक २९.९.२००४
६. शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : विजाक २००४/प्र.क्र.१८१/मावक-२, दिनांक ६.१०.२००४
७. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : इबीसी २०११/ प्र.क्र.४/ मावक-२, दिनांक २.८.२०११
८. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.विजाभज/ शिक्षण/मॅपिंग/१६-१७/४४, दिनांक ५.१.२०१७
९. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.विजाभज/ शिक्षण अभ्यासक्रम/६०१/१९८४, दिनांक ९.८.२०१७

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या सन १९९८ मधील मार्गदर्शक सूचनेनुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. केंद्र शासनाच्या सदरहू पत्रकामध्ये "अ,ब,क,ड,इ" अशा अभ्यासक्रम गटांचा समावेश करण्यात आलेला असून, अनुज्ञेय अभ्यासक्रम तसेच निवासी व अनिवासी लाभार्थ्यांच्या निर्वाहभत्त्याचे दर नमूद करण्यात आलेले आहेत. त्यामधील "अ, ब, क, ड, इ" या अभ्यासगटातील अनुज्ञेय अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. तथापि, वरील अभ्यासगटा अंतर्गत कोर्सेस विहीत करण्यात आलेले नसल्याने, आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी वरील पत्रान्वये उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर, याचिका क्र. २४८७/२०१६ च्या अनुरोधाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर

(३) वरील प्रमाणे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अदा करण्यासंबधात, सर्व संबंधित विभागांनी त्यांच्याकडील शिष्यवृत्ती/फ्रि-शिप योजनांच्या अनुषंगाने आवश्यक त्या अटी शर्ती विहीत कराव्यात.

(४) **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शिष्यवृत्ती व फ्रि-शिप योजनांच्या संदर्भात महाविद्यालय, शैक्षणिक संस्था व विद्यापीठांची जबाबदारी :-**

(i) विद्यार्थ्यांची सर्व प्रकारची पात्रता ( प्रवेश, जात, उत्पन्न, रहिवास, मागील वर्षात उत्तीर्ण झाल्याची खात्री, आधार, बँक तपशील इ.) सर्व मुळ कागदपत्रे तपासून खात्री करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

(ii) महाविद्यालयाचे प्राचार्यानी महाविद्यालयाची मान्यता, संलग्नता, अभ्यासक्रमाची मान्यता, प्रवेश क्षमता आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेले शुल्क (Fee structure) याची खात्री करणे अनिवार्य राहील.

(iii) वरीलप्रमाणे विद्यार्थी व महाविद्यालयाच्या पात्रतेची खात्री करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तातडीने मंजूर करुन ते संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे पाठविण्याची/ फॉरवर्ड करण्याची जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

(iv) सन २०१७-१८ मधील ज्या विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क-परिक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयांना अदा केली जाईल, ती या शैक्षणिक वर्षात यापुर्वी संबंधित विद्यार्थी वा महाविद्यालयाला दिलेली नाही, तसेच अशा विद्यार्थ्यांना वा महाविद्यालयांना त्याच कालावधीसाठी ती पुन्हा दिली जाणार नाही, तसेच शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजनेअंतर्गत दुबार लाभ प्रदान होणार नाही, याबाबत संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.

(v) संबंधित महाविद्यालयांच्या पात्रतेबाबतची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील आणि त्याबाबतचे अभिलेख सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांची राहील.

**(५) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांची जबाबदारी :-**

(i) प्रस्तुत शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वी, संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी त्यांच्या परिक्षेत्रातील महाविद्यालयांतील पात्र विद्यार्थ्यांपैकी सन २०१७-१८ या वर्षासाठी लाभ दिलेल्या विद्यार्थ्यांचा तपशिल तात्काळ संबंधित महाविद्यालयांना अवगत करावा.

संदर्भीय दिनांक ८.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. तथापि, महाडीबीटी प्रणालीवर शिष्यवृत्तीच्या योजनांचे लाभ अदा करण्याच्या दृष्टीने, सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत पुर्णतः कार्यान्वित झालेली नसल्याने, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मंजूर करावयाच्या शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेचा पुर्ण लाभ ऑफलाईन पध्दतीने पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अदा करण्याचा निर्णय दिनांक २९.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. याच धर्तीवर विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांबाबत त्या विभागाने निर्णय घेतला. तर उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग आणि आदिवासी विकास विभागाने त्यांच्याकडील जुन्या प्रणालीद्वारे अर्ज निकाली काढण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सर्व संबंधित विभागांमार्फत सन २०१७-१८ मधील पात्र विद्यार्थ्यांच्या प्राप्त अर्जांपैकी ५० टक्क्यापेक्षा जास्त अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही माहे मार्च,२०१८ अखेरपर्यंत करण्यात आली.

३. परंतु, काही शैक्षणिक संस्थांकडील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/फ्रि-शिपचे अर्ज सहायक आयुक्त, समाजकल्याण वा संबंधित प्राधिकारी यांच्याकडे मुदतीत सादर होवू न शकल्याने संबंधित शैक्षणिक संस्थांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम प्राप्त होवू शकली नाही. तसेच काही शैक्षणिक संस्थांकडील विद्यार्थ्यांचे अर्ज विलंबाने संबंधित प्राधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आल्याने त्यावरील देय रक्कम शैक्षणिक संस्थांना प्राप्त झालेली नाही. त्याचबरोबर सन २०१७-१८ हे शैक्षणिक वर्ष संपुष्टात आल्याने या वर्षातील शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम आता विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केल्यास व अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांनी सदर रक्कम महाविद्यालयात जमा न केल्यास शैक्षणिक संस्थांचे नुकसान होणार असल्याने, काही शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या महाविद्यालयांत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम थेट महाविद्यालयांना अदा करण्याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. त्या मधील रिट याचिका क्र.४०८/२०१८ या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठात दिनांक १६.४.२०१८, दिनांक २३.४.२०१८ व दिनांक २६.४.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये, सन २०१७-१८ मधील महाविद्यालयांतील प्रवेशित मागासप्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अदा करण्यासंबधी उपाययोजना करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले. त्यानुसार, मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ३.५.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये सन २०१७-१८ मधील महाविद्यालयांतील प्रवेशित मागासप्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग) व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अदा करण्यासंबधी उपाययोजना करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन शासन निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.